ISSN–2278-5655

AMIERJ **Aarhat Multidisciplinary International Education Research Journal**

*Volume–XII, Issue– IV* *July – August, 2023*

OPEN ACCESS Original Research Article

# शैक्षणिक कार्याच्या संदर्भात अशासकीय संस्थांच्या योगदानाचा अभ्यास करणे

* सीमा दौलत काळे

** डॉ. स्वर्णलता हरिचंदन

*संशोधन अभ्यासक,

** संशोधन मार्गदर्शक,सेवासदन कॉलेज ऑफ एज्युकेशन.

**सारांश:**

“विद्येविना मती गेली, मती विना गति गेली, गति विना वित्त गेले, वित्ता विना क्षुद्र खचले, इतके अनर्थ ऐका अविद्येने केले.” – महात्मा फुले. ह्या ओळीतून शिक्षणाचे महत्व लक्षात येते. २१ व्या शतकात शिक्षणाचे महत्त्व खूप वाढले आहे. शिक्षणाची अनेक दालने खूली झाली आहेत. परंतू सर्वच क्षेत्रात काम करणे सरकारला शक्य नसते अशावेळी अशासकीय संस्था नागरिकांना मदत करत असतात. अशासकीय संस्थांनी शिक्षण क्षेत्रात महत्त्वाची कामगिरी केलेली दिसून येते. सदर संशोधनामध्ये शैक्षणिक कार्यांच्या संदर्भात अशासकीय संस्थांच्या योगदानाचा अभ्यास करण्यात आला आहे. ह्या संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन पध्दतीमधील सर्वेक्षण पध्दतीचा उपयोग करण्यात आला आहे. त्यासाठी अशासकीय संस्थांची निवड करण्यात आली आहे. अशासकीय संस्थांचा शैक्षणिक कार्यावर सकारात्मक प्रभाव पडत आहे. अनेक गरीब विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्यासाठी अशासकीय संस्थांची खूप मदत होते. अशासकीय संस्थांनी शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या योगदानामधून देशामध्ये भक्कम शैक्षणिक पाया निर्माण करणे हा हेतू आहे.

**मुख्य शब्द:** शैक्षणिक कार्य, अशासकीय संस्था

**Copyright © 2023 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

## प्रस्तावना

अशासकीय संस्था ही अशी संस्था असते ज्यामध्ये सरकारचा कोणताही हस्तक्षेप नसतो. अशासकीय संस्थांनाच स्वयंसेवी संस्था असे म्हणतात.

इंग्रजीमध्ये त्यांना Non-Governmental Organization (NGO) असे म्हणतात. अशासकीय संस्थांचा प्रमुख उद्देश गरीब लोकांना मदत करणे, त्यांच्या अडचणी समस्या साडविणे हा

असतो. अशासकीय संस्था या खाजगी संस्था असतात. ज्यांचा प्रमुख हेतू सामाजिक कार्य करणे हा असतो. अशासकीय संस्थांचा मुख्य विकास हा अमेरिकेत झाला आहे. कारण अमेरिकेमध्ये अशी खूप सामाजिक कार्ये केली जातात जी सरकारद्वारे न होता काही संस्थांद्वारे केली जातात. अशासकीय संस्था ह्या स्वयंस्फूर्तीने निर्माण झाल्या आहेत. जगातील अनेक देशांमध्ये अशासकीय संस्थांचे महत्त्व वाढले असल्याचे दिसून येते. भारतातादेखील अशासकीय संस्थांनी समाज विकासात महत्त्वाची कामगिरी पार पाडली आहे. अशासकीय संस्था शैक्षणिक कार्ये, आरोग्यविषयक कार्ये, महिला सक्षमीकरण, नैसर्गिक आपत्ती, अशा अनेक क्षेत्रात कार्य करत असतात. भारतातील बालशिक्षण तळागाळापासून सुरू व्हावे आणि शिक्षण व्यवस्था मजबूत व्हावी यासाठी अशासकीय संस्था कार्य करतात. अशासकीय संस्था शिक्षणाच्या प्रसाराविषयी जागृकता पसरवतात.

आर्थिक प्रगतीचा मार्ग पुढे चालू ठेवण्यासाठी देशाच्या सर्व भागांमध्ये शिक्षण देशाच्या सर्व भागांमध्ये शिक्षण देण्यासाठी कुशल आणि प्रशिक्षित मनुष्यबळाची आवश्यकता आहे. त्यासाठी अशासकीय संस्थांचे महत्त्व सरकारला समजले आहे. अनेक अशासकीय संस्था देशात साक्षरता आणि उच्च शिक्षण देण्यासाठी कार्यरत आहेत. मुख्यत: मुलींसाठी शिक्षणाद्वारे पात्र विद्यार्थ्यांचे जीवन सुधारण्यासाठी अनेक योजना आणि कार्यक्रम अशासकीय संस्थांद्वारे पूर्ण करण्यात आले आहे. यामुळे समाजिक आणि आर्थिकदृष्ट्या कमकुवत कुटुंबातील मुलींना दर्जेदार शिक्षणाचा सहज आणि निशुल्क प्रवेश मिळण्यासाठी मदत होते आणि परिणामी गळतीचे प्रमाण कमी होते.

**संशाधनाची गरज आणि महत्त्व :**

२१ व्या शतकात शिक्षण ही फक्त राष्ट्रीय यशाची गरज राहिलेली नाही तर आपल्या देशाला जागतिक स्तरावर देशाला उच्च स्थान मिळवून देण्यासाठी शिक्षण महत्त्वाचे आहे. प्रस्तुत संशोधनामुळे समाजातील गरिब आणि कमकुवत गटातील विद्यार्थी आणि पालकांना अशासकीय संस्थांच्या कार्यांविषयी माहिती मिळेल आणि त्यांना आपले शिक्षण पूर्ण करण्यास मदत मिळेल. असे विद्यार्थी ज्यांना शासनातर्फे मदत मिळू शकत नाही ते अशासकीय संस्थांची मदत घेऊ शकतील. शालेय आणि उच्च शिक्षणातील गळतीचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल. अशासकीय संस्थांना विद्यार्थी आणि पालकांच्या समस्या समजातील आणि ते जास्तीत जास्त मदत करण्यास सक्षम बनतील.

**संशोधन समस्या :**

शैक्षणिक कार्यांच्या संदर्भात अशासकीय संस्थांच्या योगदानाचा अभ्यास करणे.

**कार्यात्मक व्याख्या :**

शैक्षणिक कार्य : समाजातील तळागाळातील नागरिकांना शिक्षण घेण्यासाठी मदत करणे, यास शैक्षणिक कार्य असे म्हणतात.

अशासकीय संस्था : सरकारच्या कोणत्याही हस्तक्षेपाशिवाय स्वयंप्रेरणेने नागरिकांना त्याच्या विकासासाठी मदत करण्या–या संस्था म्हणजे अशासकीय संस्था होय.

**उद्दिष्टे :**

१) अशासकीय संस्थांच्या शैक्षणिक कार्यांचा शोध घेणे.

२) शैक्षणिक कार्यांच्या संदर्भात अशासकीय संस्थांच्या योगदानाचा अभ्यास करणे.

**संशोधन प्रश्न :**

१) शैक्षणिक कार्यामध्ये अशासकीय संस्थांचे योगदान किती आहे?

**व्याप्ती आणि मर्यादा :**

प्रस्तुत संशोधनामध्ये ठाणे जिल्ह्यातील उल्हासनगर तालुक्यातील अशासकीय संस्थांचा समावेश करण्यात आला आहे. ठाणे जिल्ह्यातील इतर तालुक्यातील अशासकीय संस्थांचा समावेश करण्यात आलेला नाही. तसेच अशासकीय संस्थांच्या केवळ शैक्षणिक कार्यांचा समावेश करण्यात आला आहे इतर कार्यांचा समावेश करण्यात आलेला नाही.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक पध्दतीमधील सर्वेक्षण पध्दतीचा वापर करण्यात आलेला आहे.

**संशोधन साहित्य :**

प्रस्तुत संशोधनासाठी स्वनिर्मित प्रश्नावलीचा वापर करण्यात आला असून चार अशासकीय संस्थांच्या प्रमुखांद्वारे प्रश्नावली तपासण्यात आली आहे.

**नमुना :**

प्रस्तुत संशोधनासाठी ठाणे जिल्ह्यातील उल्हासनगर तालुक्यातील २५ अशासकीय संस्थांची निवड करण्यात आली आहे.

**माहिती विश्लेषण व अर्थनिर्वचन :**

प्रस्तुत संशोधनात मिळालेल्या माहितीचे विश्लेषण करण्यासाठी टक्केवारीचा उपयोग केलेला आहे.

ISSN–2278-5655

AMIERJ **Aarhat Multidisciplinary International Education Research Journal**

*Volume–XII, Issue– IV* *July – August, 2023*

OPEN ACCESS Original Research Article

**शैक्षणिक कार्य**

| कार्य | शैक्षणिक कार्य | सरासरी | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | विद्यार्थ्यांच्या शाळेचे शुल्क भरणे | ९१ | २६ |
| २ | विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देणे | ११३ | ३२ |
| ३ | विद्यार्थ्यांना गणवेश देणे | ६२ | १८ |
| ४ | उच्च शिक्षणासाठी गरिब मुलांना मदत करणे | ८३ | २४ |




## निरीक्षण :

वरील आलेख आणि तक्त्यावरून असे दिसून येते की, अशासकीय संस्थांनी शाळेचे शुल्क भरणे याकार्यामध्ये २६% योगदान केले आहे, विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देण या कार्यासाठी ३२% योगदान दिले आहे. विद्यार्थ्यांना गणवेश देणे या कार्यासाठी १८% योगदान दिले आहे आणि उच्च शिक्ष्याणसाठी गरिब मुलांनां मदत करण याकार्यासाठी २४% योगदान दिले आहे.

## निष्कर्ष :

वरील निरीक्षणावरून असा निष्कर्ष निघतो की, अशासकीय संस्थांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देणे या कार्यासाठी सर्वात जास्त योगदान दिले आहे.

## संदर्भ ग्रंथ :

Best, J.W. (1983). Research in Education (forth edn.) New Delhi. Prentice hall of India privet Limited.

David Lewis & Nazneen Kanji – 'Non Governmental Organisations and Development'. 2009.

## मराठी ग्रंथ :

आगलावे, प्रदिप. संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे

कदम, चा. प. आणि चौधरी बा. आ. (१९९२). शैक्षणिक मूल्यमापन. पुणे : नुतन प्रकाशन.

## Websites :

http://www.eric.org/index.html

http://en.wikipedia.org/research

***Cite This Article:***

* **काळे स. द. & ** डॉ. हरिचंदन स.** *(2023)* शैक्षणिक कार्याच्या संदर्भात अशासकीय संस्थांच्या योगदानाचा अभ्यास करणे, ***Aarhat Multidisciplinary International Education Research Journal, XII (IV) July-Aug, 107-110.***